# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७४८ दिनांक १६/१०/२०२०

## पालघर पोलीस दलाकडुन पालघर जिल्हयातील २६ शाळेमधील विदयार्थ्यांसाठी Student Police Cadet Programme चे आयोजन

पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे सन २०२०-२१ या वर्षी Student Police Cadet Programme हा कार्यक्रम इयत्ता ०८ ते ०९ वी विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येत आहे. यास अनुसरुन पालघर जिल्ह्यातील **पालघर, सातपाटी, डहाणु, तलासरी, जव्हार, विक्रमगड या तालुक्यांमधील एकुण** २६ शाळांची निवड करण्यात आली आहे.

या कार्यक्रमा करीता केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्या निधी मधुन रु.१६,०००/- पर्यंतची (अक्षरी सोळा हजार मात्र) इतका निधी शैक्षणीक साहित्य तसेच खेळाचे साहित्य खरेदी करणेकरीता खर्च करणेबाबत कळविले आहे. निवड अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे त्याप्रमाणे जिल्हा शिक्षण अधिकारी, श्रीमती लता सानप व गट शिक्षण अधिकारी पालघर यांच्या मिटिंग घेवुन त्यांना अभ्यासक्रमाची रुप रेषा कळविण्यात येऊन अंतर्वग व बाह्यवर्ग प्रशिक्षण कोणत्या प्रकारे देण्यात येणार आहे, हे सुद्धा पीपीटी द्वारे कळविण्यात आलेले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता प्रत्यक्षात वर्ग घेण्यात येत नसल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्याचे आदेश मा. पोलीस अधीक्षक, श्री.दत्तात्रय शिंदे यांनी दिलेले आहे. तसेच विद्यार्थ्यांकडील साधनांची उपलब्धता पाहता zoom app व इतर ॲपद्वारे सुद्धा प्रशिक्षण देण्याची तयारी पालघर पोलीसांनी ठेवलेली आहे. याकरीता पालघर जिल्हयामधील ६ पोलीस अधिकारी व २६ पोलीस कर्मचारी यांची निवड करण्यात आलेली असुन ते विद्यार्थीना त्यांतर्गत गुन्हयांना प्रतिबंध, रस्ते सुरक्षा व वाहतुक जागरुकता, भ्रष्टाचार निर्मुलन, संवेदनशिलता, सहानुभुती, महिला व बालकांची सुरक्षितता, समाजाचा विकास, दुष्ट सामाजिक प्रवृत्तीस आळा घालणे, नितीमुल्य, शिस्त, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता इ. विषयाचे प्रशिक्षण देण्यात येणार असुन समन्वय अधिकार म्हणुन पोलीस कल्याण शाखा येथील पोउपनि/विचारे, मपोशि/सहाणे, पोशि/झिणे व मपोशि/गुंजाळ व हे कर्मचारी हा कार्यक्रम यशस्वीरित्त्या करण्याकरीता प्रयत्न करत आहे.

हा अभ्यासक्रम सुरु करीत असताना विद्यार्थ्यांना शासनातर्फे माझे कुटूंब माझी जबाबदारी याबाबत थोडक्यात माहीती देवुन त्यांना मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.